प्रकरण दुसरे

राष्ट्रीय उत्पन्न (National Income)

राष्ट्रीय उत्पन्न : अर्थ

राष्ट्रीय उत्पन्न ही संकल्पना विशिष्ट कालावधीच्या संदर्भात म्हणजे साधारणपणे एक वर्षाचा कालखंड विचारात घेऊन वापरली जाते स्थूल मानाने राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एक वर्षाच्या काळात देशातील नागरिकांनी उत्पादित केलेल्या वस्तू व सेवांचे कोणत्याही प्रकारे दुहेरी मापन न करता पैशात व्यक्त केले जाणारे मूल्य होय.राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना फक्त अंतिम वस्तू विचारात घेऊन त्या अंतिम वस्तू व सेवांना त्यांच्या किमतीने गुणून पैशात मापन केले जाते.

राष्ट्रीय उत्पन्न : व्याख्या/संकल्पना (Defination) :

डॉ.मार्शल : "एका विशिष्ट कालखंडात मानवी श्रम आणि भांडवलाच्या साह्याने नैसर्गिक साधनसामुग्रीचा वापर करून वस्तू व सेवांचे जे निव्वळ उत्पादन केले जाते त्याचे पैशातील मूल्यांकन म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय."

डॉ.मार्शल यांनी राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन एका वर्षाच्या काळाच्या संदर्भात केलेल्या आहेत राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना अंतिम वस्तू व सेवांचे मूल्य विचारात घेतलेले आहे राष्ट्रीय उत्पन्न ही संकल्पना निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न या अर्थाने वापरलेली आहे परंतु या व्याख्येत देशात उत्पादित होणाऱ्या विविध वस्तू व सेवांचे अचूक मापन करता येत नाही तसेच वस्तू व सेवांचे मापन करताना दुहेरी मापन होण्याची शक्यता असते जेव्हा उत्पादक वस्तू स्वतःच्या उपभोगासाठी राखून ठेवतो तेव्हा त्या वस्तू व सेवा राष्ट्रीय उत्पन्नात समाविष्ट होत नाहीत.

डॉ.पिगू : " समाजाच्या वस्तुनिष्ठ उत्पादनातील ज्या भागाची पैशात मोजतात करता येते त्या भागाला राष्ट्रीय उत्पन्न असे म्हणतात यात विदेशी व्यवहारातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा देखील समावेश केला जातो".

डॉ.पिगु यांच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या व्याख्येत उत्पादित झालेल्या परंतु खरेदी विक्री न झालेल्या वस्तू व सेवा समाविष्ट होत नाही अविकसित देशात वस्तू विनिमयाद्वारे खरेदी विक्रीचे व्यवहार होतात त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे अचूक मापन होणार नाही.

भारतीय राष्ट्रीय उत्पन्न समिती : " राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एका विशिष्ट कालखंडात(एक वर्ष) निर्माण करण्यात आलेल्या वस्तू आणि सेवांचे दुहेरी मोजदाद होऊन न देता केलेले मापन होय".

राष्ट्रीय उत्पन्नाची वैशिष्ट्ये (Characteristics) :

राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध व्याख्यांवरून राष्ट्रीय उत्पन्नाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतील.

1) राष्ट्रीय उत्पन्न ही संकल्पना देशाच्या संदर्भात वापरली जाते.

2) राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन एका वर्षाच्या कालावधीसाठी केले जाते.

3) एका वर्षाच्या काळात निर्माण झालेल्या वस्तू व सेवांची बाजारातील किंमत विचारात घेऊन राष्ट्रीय उत्पन्नात मोजले जाते.

4) राष्ट्रीय उत्पन्नात देशात उत्पादित होणाऱ्या अंतिम वस्तू व सेवांचा समावेश केला जातो .

5) राष्ट्रीय उत्पन्न प्रवाह स्वरूपात असते.

6) राष्ट्रीय उत्पन्नाच्या मापनात देशातील नागरिकांनी परदेशात मिळवलेले उत्पन्न समाविष्ट केले जाते विदेशी नागरिकांनी देशातून मिळवलेले उत्पन्न राष्ट्रीय उत्पन्नातून वजा केले जाते.

राष्ट्रीय उत्पन्नाच्या विविध संकल्पना :

1) स्थूल देशांतर्गत उत्पादन (Gross Domestic Product - GDP) : एका वर्षाच्या कालखंडात देशातील नागरिकांनी उत्पादित केलेल्या वस्तू व सेवांचे कोणत्याही प्रकारे दुहेरी मापन न करता पैशात व्यक्त केले जाणारे मूल्य म्हणजे स्थूल देशांतर्गत उत्पादन होय.

2) स्थूल राष्ट्रीय उत्पादन (Gross National Product - GNP) : "अर्थव्यवस्थेत विशिष्ट कालखंडात उत्पादित होणाऱ्या सर्व अंतिम वस्तू व सेवांचे बाजारभावानुसार केलेले मूल्यांकन म्हणजे स्थूल राष्ट्रीय उत्पादन होय ".

स्थुल राष्ट्रीय उत्पादन काढण्याचे सूत्र-

स्थूल राष्ट्रीय उत्पादन = स्थूल देशांतर्गत उत्पादन + देशातील नागरिकांनी विदेशात केलेले उत्पादन अथवा मिळवलेले

उत्पन्न - विदेशातील नागरिकांनी देशात केलेले उत्पादन अथवा मिळवलेले उत्पन्न.

GNP = GDP +(x-m).

स्थूल राष्ट्रीय उत्पादन मापनाच्या पद्धती :

अ) चालू व स्थिर किमतीनुसार स्थूल राष्ट्रीय उत्पादन :

i) चालू किमतीनुसार स्थूल राष्ट्रीय उत्पादन : एका वर्षाच्या कालखंडात उत्पादित झालेल्या सर्व वस्तू व सेवांचे चालू किमतीनुसार करण्यात आलेले राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन म्हणजे चालू किमतीनुसार स्थूल राष्ट्रीय उत्पन्न होय. उदा. 2012- 13 च्या राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन 2012- 2013 च्या किमती विचारात घेऊन करणे.

ii) स्थिर किमतीनुसार स्थूल राष्ट्रीय उत्पादन : आधारभूत वर्षातील किमती विचारात घेऊन पुढील काळात एखाद्या वर्षात उत्पादित होणाऱ्या वस्तू व सेवांच्या मूल्याचे केलेले मापन होय.उदा- 2010 -11 च्या किमतीनुसार 2012- 13 या वर्षातील राष्ट्रीय उत्पन्नाचे केलेले मापन होय.

ब) घटक खर्चानुसार स्थूल राष्ट्रीय उत्पादन : एका विशिष्ट कालखंडात उत्पादन घटक मालकांना त्यांच्या कार्याबद्दल अथवा सेवा पुरविल्याबद्दल मिळणाऱ्या उत्पन्नाची बेरीज म्हणजे घटक खर्चानुसार स्थूल राष्ट्रीय उत्पन्न होय.

3) निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न : (Net National Product - NNP):

" एका विशिष्ट कालखंडात स्थूल राष्ट्रीय उत्पादनातून घसारा खर्च वजा केल्यास शिल्लक राहणारे उत्पादन म्हणजे निव्वळ राष्ट्रीय उत्पादन होय."

सूत्र: निव्वळ राष्ट्रीय उत्पादन = स्थूल राष्ट्रीय उत्पादन - घसारा.

NNP = GNP - D.

घसारा या संकल्पनेत इमारती यंत्रसामग्री वाहतूक साधने यांच्या पुनर्रस्थापनेसाठी येणाऱ्या खर्चाची दरवर्षी तरतूद केली जाते.निव्वळ राष्ट्रीय उत्पादन या संकल्पनेमुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे खरे स्वरूप समजते.देशाच्या उत्पादनात नेमकी किती भर पडली हे समजते. निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना दरवर्षी घसारा खर्च किती गृहीत धरावा हे कठीण आहे.प्रत्येक भांडवली वस्तू वापरण्याची पद्धत आणि प्रत्येक भांडवली वस्तूचे आयुर्मान वेगवेगळे असते.

4) दरडोई उत्पन्न (Per Capita Income) : एका विशिष्ट वर्षातील राष्ट्रीय उत्पन्नाला त्याच वर्षाच्या लोकसंख्येने भागल्यास येणारे उत्पन्न म्हणजे दरडोई उत्पन्न होय.

सूत्र:

राष्ट्रीय उत्पन्न

दरडोई उत्पन्न = --------------------

लोकसंख्या

दरडोई उत्पन्न ही संकल्पना राष्ट्रीय उत्पन्न या संकल्पनेपेक्षा भिन्न आहे राष्ट्रीय उत्पन्नावरून देशाच्या अर्थव्यवस्थेची स्थिती समजते सर्वसामान्य व्यक्ती कसे जीवन जगते हे समजत नाही दरडोई उत्पन्नावरून देशातील प्रत्येक व्यक्तीचा राष्ट्रीय उत्पन्नात किती वाटा आहे हे समजते. दरडोई उत्पन्नावरून लोकांच्या राहणीमानाच्या

पातळीची कल्पना येते. जर राष्ट्रीय उत्पन्नात होणाऱ्या वाढीएवढी देशाची लोकसंख्या वाढली तर दरडोई उत्पन्न स्थिर राहील आणि लोकांच्या राहणीमानाच्या पातळीत सुधारणा होणार नाही.जर लोकसंख्येत होणाऱ्या वाढीच्या तुलनेत राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा वेग जास्त असेल तर दरडोई उत्पन्न वाढवून लोकांच्या राहणीमानाच्या पातळीत वाढ होईल.

थोडक्यात दरडोई उत्पन्नावरून देशातील सामाजिक कल्याण व राहणीमान लक्षात येते. व्यक्तीचा उपभोग हा त्याला मिळणाऱ्या दरडोई उत्पन्नावर अवलंबून असतो. व्यक्तीचे राहणीमान अथवा कल्याण व्यक्तीच्या उत्पन्नावर अवलंबून असते. दरडोई उत्पन्नाची पातळी जेवढी जास्त तेवढे राहणीमान उच्च व दरडोई उत्पन्न पातळी जेवढी कमी तेवढा राहणीमानाचा दर्जा खालावलेला असतो. आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी दरडोई उत्पन्न हा एक महत्त्वाचा निदर्शक मानला जातो.

5) वैयक्तिक किंवा व्यक्तिगत उत्पन्न (Personal Income) :

एका वर्षाच्या काळात देशातील व्यक्ती अथवा कुटुंबांना प्रत्यक्ष मिळालेले एकूण उत्पन्न म्हणजे वैयक्तिक उत्पन्न होय.

6) खर्चयोग्य /व्ययशक्य /विनियोगक्षम उत्पन्न : (Disposable Income):

"व्यक्तिगत उत्पन्नातून प्रत्यक्ष कराची रक्कम वजा जाता शिल्लक राहणारे उत्पन्न म्हणजे खर्च योग्य उत्पन्न होय."

सूत्र : व्ययशक्य उत्पन्न = व्यक्तिगत उत्पन्न - प्रत्यक्ष कर.

खर्चयोग्य उत्पन्न म्हणजे वैयक्तिक उत्पन्नातून कर वजा जाता शिल्लक राहणारे उत्पन्न होय.खर्चयोग्य उत्पन्न हे उपभोग खर्च आणि बचत यांच्या बेरजेबरोबर असते. खर्चयोग्य उत्पन्न व्यक्तिगत उत्पन्नापेक्षा कमी असते. लोकांच्या खरेदीशक्तीचे व बचत क्षमतेचे आकलन खर्चयोग्य उत्पन्नावरून होते.

प्रश्न : राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या विविध पद्धती स्पष्ट करा.()Methods of National Income Measurement)

उत्तर : सामान्यपणे एका वर्षाच्या कालखंडात देशात उत्पादित होणाऱ्या अंतिम वस्तू व सेवा यांच्या मूल्यांची बाजार किंमतीनुसार बेरीज म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न होय देशात हजारो प्रकारच्या वस्तू व सेवा वेगवेगळ्या प्रमाणात उत्पादित केल्या जातात प्रत्येक वस्तूचे बाजार मूल्य वेगवेगळया असते त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करणे अवघड असते राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करण्याच्या तीन प्रमुख पद्धतीने पुढील प्रमाणे आहेत.

1) उत्पादन पद्धती (Production Method): या पद्धतीत एका वर्षाच्या कालावधीत देशात उत्पादित झालेल्या सर्व वस्तू व सेवा यांचे बाजारातील मूल्य विचारात घेऊन मापन केले जाते. राष्ट्रीय उत्पादनाचे मापन करताना अर्थव्यवस्थेची शेती,उद्योग,जंगल, बांधकाम,वाहतूक व दळणवळण बँक,वित्त,विमा,व्यावसायिक सेवा अशा विविध क्षेत्रात विभागणी केली जाते. प्रत्येक क्षेत्रातील उत्पादनाचे मापन करून त्यांची बाजारातील चालू किमतीनुसार मोजणी केली जाते.आलेल्या उत्पन्नातून भांडवली वस्तूची होणारी झीज किंवा घसारा खर्च वजा करून निव्वळ राष्ट्रीय उत्पादन काढले जाते.

राष्ट्रीय उत्पन्नाचे या पद्धतीने मोजमाप करताना अनेक वेळा दुहेरी मापन होण्याची शक्यता असते. जसे कापडाच्या किमतीत कापसाच्या किमतीचा समावेश होतो.जेव्हा कापड आणि कापूस यांची बेरीज केल्यास राष्ट्रीय उत्पन्न अवास्तव येते तेव्हा उत्पादन पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना एका वस्तूचे किंवा सेवेची मोजणी एकाच वेळी करण्याची दक्षता घ्यावी लागते. थोडक्यात राष्ट्रीय उत्पन्न मोजताना अंतिम वस्तूचे मूल्य विचारात घेऊन राष्ट्रीय उत्पन्न मोजले पाहिजे उत्पादन पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करण्यासाठी विविध क्षेत्राच्या उत्पादनांची अद्ययावत व अचूक आकडेवारी उपलब्ध पाहिजे .विकसनशील देशात अचूक आकडेवारी उपलब्ध नसल्याने या पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन बिनचूक होत नाही.

2) उत्पन्न पद्धती (Income Method): या पद्धतीत एका वर्षाच्या काळात देशातील व्यक्ती व संस्था यांना मिळणाऱ्या उत्पन्नाची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन केले जाते.वस्तू व सेवांचे उत्पादन करण्यासाठी भूमी, श्रम,भांडवल,संयोजक या चार उत्पादन घटकांचा वापर केला जातो. या चार उत्पादन घटकांना त्यांच्या वापराबद्दल मजुरी,खंड,व्याज आणि नफा या स्वरूपात उत्पन्न प्राप्त होते,या पद्धतीत उत्पादन घटकांना मिळणाऱ्या घटक मोबदल्यांची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन केले जाते म्हणून या पद्धतीलाच 'घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न पद्धती 'असेही म्हणतात.सर्व उत्पादन घटकांना वितरित केलेल्या उत्पन्नाची बेरीज देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाइतके असते.

उत्पन्न पद्धतीने नुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना एकच उत्पन्न दोनदा मोजले जाणार नाही याची दक्षता घ्यावी लागते. या पद्धतीत कोणतेही काम न करता मिळालेल्या उत्पन्नाच्या समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही. तसेच विनामूल्य सेवांचा ही राष्ट्रीय उत्पन्नात समावेश केला जात नाही. उदा बेकारी भत्ता, वृद्धांना दिले जाणारे निवृत्तीवेतन इत्यादी. तसेच या पद्धतीत देणगी मदत वारसा पाणी मिळालेले उत्पन्न जुगाराचे उत्पन्न चोरटा व्यापार व इतर हस्तांतरित उत्पन्नाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जात नाही. या पद्धतीने

राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना ज्या सेवांना मोबदले दिले जात नाहीत त्या सेवा वगळल्या पाहिजेत उदा गृहिणींची सेवा,सरकारी अर्थसहाय्य,कंपन्यांचा अवितरित नफा इत्यादी. या पद्धतीत आयात निर्यातीतून प्राप्त होणाऱ्या निव्वळ उत्पन्नाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात केला जातो.

3) खर्च पद्धती (Expenditure Method) : देशाचे एकूण उत्पन्न हे एकूण खर्चाबरोबर असते. खर्च पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना एका वर्षाच्या कालावधीत खाजगी व्यक्ती व संस्थांनी केलेला उपभोग्य वस्तू व सेवांवरील खर्च आणि सरकारने केलेल्या खर्चाची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन केले जाते. म्हणून या पद्धतीस खर्च पद्धती असे म्हणतात या पद्धतीने नुसार अर्थव्यवस्थेतील एका वर्षाच्या काळातील सर्व खर्चाची बेरीज ही राष्ट्रीय उत्पन्ना इतकी येते.

खर्च पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना एकूण खर्चाचे तीन भागात वर्गीकरण केले जाते.

i) उपभोग खर्च : एका वर्षाच्या कालावधीत संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या उपभोग्य वस्तू व सेवांवरील खर्चाचा विचार यामध्ये केला जातो. समाजाचा एकूण खर्च या 'C 'चिन्हाने दर्शविला जातो.

ii) गुंतवणूक खर्च : सामान्यपणे उत्पादक कार्यासाठी होणाऱ्या भांडवली खर्च म्हणजे गुंतवणूक खर्च होय. गुंतवणूक खर्च 'T'या अक्षराने दर्शवला जातो.

iii) सरकारी खर्च : सरकारने उपभोग्य वस्तूंचे निर्मिती करण्यासाठी व जनतेला विविध सेवा पुरवण्यासाठी केलेल्या खर्चाला सरकारी खर्च असे म्हणतात. उदा. संरक्षण खर्च, कायदा व सुव्यवस्था शिक्षण,आरोग्य सेवा,वाहतूक व दळण इत्यादी वरील खर्च.सरकारी खर्च 'G' या चिन्हाने दर्शवला जातो.

एकूण खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना आयात मूल्य व निर्यात मूल्याचा विचार केला जातो आयात मूल्य 'M 'या चिन्हाने तर निर्यात मूल्य ' X'या चिन्हाणे दर्शविले जातात.

सूत्र : $Y = C+I+G(X-M)$

खर्च पद्धतीनुसार स्थूल राष्ट्रीय उत्पन्न = खाजगी उपभोग खर्च +खाजगी गुंतवणूक खर्च +सरकारचा उपभोग व गुंतवणूक खर्च +निव्वळ विदेशी खर्च.

अशा प्रकारे राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करण्याच्या उत्पादन पद्धती,उत्पन्न पद्धती व खर्च पद्धती या तीन पद्धती आहेत. या तीन पद्धतींपैकी कोणत्याही एका पद्धतीचा राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन केल्यास राष्ट्रीय उत्पन्न सारखे आले पाहिजे. राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करण्यासाठी कोणत्या एका पद्धतीवर अवलंबून न राहता अर्थव्यवस्थेतील वेगवेगळ्या क्षेत्रांना जी पद्धत योग्य ठरेल त्या पद्धतीचा वापर करून राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन

करणे अधिक योग्य होते.भारतात राष्ट्रीय उत्पन्न मोजण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न समितीने उत्पादन व उत्पन्न पद्धतीचे एकत्रित करून उत्पादन -उत्पन्न पद्धतीचा वापर केला आहे.

प्रश्न : राष्ट्रीय उत्पन्न गणनेतील /मापनातील अडचणी स्पष्ट करा. (Difficulties of the Measurement of National Income)

उत्तर : राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करण्यामध्ये दोन प्रकारच्या अडचणी येत असतात.

अ) संकल्पनात्मक अडचणी : यामध्ये व्याखेबाबत असलेल्या मतभेदातून या अडचणी निर्माण होत असतात. राष्ट्रीय उत्पन्नामध्ये कोणकोणत्या व्यक्तींचा समावेश करावा याबाबतीत अर्थशास्त्रज्ञांमध्ये मतभेद आहेत .राष्ट्रीय उत्पन्नाची संकल्पना स्पष्ट न झाल्याने या अडचणी निर्माण होतात.

काही प्रमुख संकल्पनात्मक समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

1) सेवांचा समावेश : सेवांचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नामध्ये करावा किंवा करू नये याबाबतीत मतभेद आहे.परंतु कोणकोणत्या सेवा मोजाव्यात व कोणत्या सेवा वगळाव्यात याबद्दल अडचणी निर्माण होतात म्हणून पैसे घेऊन केलेल्या सेवा फक्त राष्ट्रीय उत्पन्नात धरल्या जातात तर मोफत सेवा वगळल्या जातात. उदा.गृहिणींच्या सेवा,स्वतःचे घर रंगवणे, स्वतःची गाडी चालविणे वगैरे या सेवा हिशोबात धरल्या जात नाही.

2) मध्यस्थ वस्तू शोधणे : राष्ट्रीय उत्पन्नामध्ये फक्त अंतिम वस्तू व सेवांचा समावेश केला जातो. मध्यस्थ वस्तू वगळण्यात येतात.परंतु प्रत्यक्ष व्यवहारांमध्ये मध्यस्थ वस्तू व अंतिम वस्तूंमध्ये निश्चितपणे भेद करता येत नाही. काही वस्तू अंतिम वस्तू किंवा मध्यस्थ वस्तू आहेत हे त्यांचा उपयोग कसा केला जातो यावर अवलंबून असते. उदा.जर पिठाचा उपयोग बेकरीमध्ये केला तर ती मध्यस्थ वस्तू ठरेल आणि जर पिठाचा उपयोग कुटुंबामध्ये केला तर ते अंतिम वस्तू होते .

3) घटक उत्पन्न शोधणे : राष्ट्रीय उत्पन्नामध्ये फक्त घटक उत्पन्नाचा समावेश होतो.त्यामुळे घटक उत्पन्न व बिगर घटक उत्पन्न वेगवेगळे करावे लागते परंतु हे कार्य सोपे नाही.अनेकदा व्यक्तीला मिळणारे उत्पन्न घटक उत्पन्नासारखे वाटते परंतु ते घटक उत्पन्न नसते. उदा.उपभोग कर्जावर देण्यात येणारे व्याज, जुने घर,मोटार गाडी किंवा शेअर्स विकून मिळालेले उत्पन्न.

4) गृहिणींच्या सेवा आणि इतर सदृश्य सेवा : ज्या वस्तू व सेवांसाठी पैशाच्या स्वरूपात मोबदला दिला जातो त्यांचा फक्त राष्ट्रीय उत्पन्नात समावेश होतो.अशा अनेक सेवा आहेत की ज्यांच्यासाठी पैशाच्या स्वरूपात मोबदले दिले जात नाहीत. गृहिणीच्या सेवेसाठी पैशाच्या स्वरूपात मोबदले दिले जात नाही तसेच कुटुंबामध्ये

पुरुष व्यक्ती देखील इतर घरकाम मुलांचा अभ्यास घेणे यासारखे अनेक कामे करतात परंतु त्यासाठी मोबदला घेत नाही परंतु या सेवा दुसऱ्या व्यक्तीकडून घेतल्या तर त्यासाठी पैसा खर्च करावा लागेल व तो राष्ट्रीय उत्पन्नात समाविष्ट होईल.

5) अवैध उत्पन्न : विदेशी वस्तूंची चोरटी आयात काळ्या बाजारातील खरेदी, बंदी असलेल्या वस्तूंचा व्यापार उदा.मादक पदार्थ. या प्रकारच्या अवैध व्यवहारांमुळे वस्तू आणि सेवा यांचा पुरवठा बदलतो म्हणून या व्यवहारांची दखल घेतली पाहिजे. पण हे सर्व व्यवहार चोरून चालतात त्यामुळे त्याचे मोजदाद करणे अवघड आहे म्हणून राष्ट्रीय उत्पन्नातून हे व्यवहार वगळले जातात.

6) शासनाच्या सेवा : उपभोक्त्यांच्या उपयोगी पडणाऱ्या सर्व सेवा अंतिम सेवा म्हणून राष्ट्रीय उत्पन्नाचा समाविष्ट झाल्या पाहिजेत परंतु शासनाच्या कोणत्या सेवा समाविष्ट कराव्यात याबाबत अडचणी निर्माण होतात. अनेक वस्तू व सेवा कोणत्याही प्रकारचे मूल्य न देता उपलब्ध होत असतात.सरकार अनेक प्रकारच्या सेवा विनामूल्य देत असते.उदा-पोलीस,संरक्षण,सर्वसामान्य प्रशासकीय सेवा इत्यादी. या सेवांचे मूल्य शोधणे अवघड असते.

7) परकीय कंपन्यांचे उत्पन्न : परकीय कंपन्यांच्या उत्पन्नाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नामध्ये करावा किंवा करू नये यामध्ये मतभेद होऊ शकतात. परकीय कंपन्यां जे उत्पन्न मायदेशी पाठवतात त्यांच्या समावेश आपल्या राष्ट्रीय उत्पन्नात करू नये.फक्त जे उत्पन्न आपल्या देशात ठेवत असतील त्यांचाच समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करावा असा एक सर्वसाधारण संकेत आहे.

7) हस्तांतरित उत्पन्न : वस्तू आणि सेवा यांची भर न घनता मिळणारे हस्तांतरित उत्पन्न राष्ट्रीय उत्पन्नात मोजावे किंवा नाही हाही असाच एक प्रश्न आहे.वस्तू व सेवा यांचे उत्पादन होत नाही म्हणून ते वगळावे तर ते खर्चून वस्तू व सेवा खरेदी केल्या जातात आणि या दृष्टीने आर्थिक व्यवहारांवर त्या उत्पन्नाचा परिणाम होत असतो.

8) घसारा मोजणे कठीण : भांडवली वस्तूंचे घसारा मूल्य त्यांच्या मूळ खर्चानुसार काढावे की त्याच्या पुनर्स्थापन खर्चानुसार काढावे हा खरा प्रश्न आहे. उद्योग संस्था मूळ किमतीनुसार घसारा मूल्य काढतात.

ब) व्यावहारिक अथवा सांख्यिकीय अडचणी : राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना उत्पादनाची पूर्ण आणि खात्रीशीर सांख्यिकीय माहिती उपलब्ध नसल्याने उत्पन्नाचे मापन करताना या अडचणी येतात.

1) अपूर्ण आणि अविश्वसनीय सांख्यिकी आकडेवारी : भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये राष्ट्रीय उत्पन्नाबाबत माहिती बिनचूक व सविस्तरपणे उपलब्ध नसते. शेती व शेती संबंधित असणाऱ्या क्षेत्राकडून

उत्पादनाची माहिती गोळा करताना अडचणी निर्माण होतात. बऱ्याचदा शेतकरी आपल्या उत्पन्न व खर्चाच्या नोंदी ठेवत नाही. त्यामुळे अचूक आकडेवारी उपलब्ध होत नाही.

2) वस्तू विनिमय पद्धती : पैशा बरोबर ज्यांचा विनिमय होतो अशा वस्तू व सेवांचे मूल्य समजणे सोपे असते. पण अनेक व्यवहार 'वस्तू विनिमयाच्या 'स्वरूपाचे असतात. भारतात विशेषत: दूरदूरच्या खेड्यापाड्यातून अनेक वस्तू व सेवा अशा पद्धतीने विकल्या जातात. धान्य देऊन सेवा घेणे, कपडे देऊन भांडी घेणे इत्यादी प्रकारच्या व्यवहारांचे नेमके मूल्य शोधणे अवघड असते.

3) निरक्षरता आणि अज्ञान : भारतातील बहुतांश लोक अशिक्षित व अडाणी आहेत. ते आपल्या उत्पन्न व खर्चाच्या नोंदी ठेवू शकत नाहीत. बऱ्याचदा ते आपल्या उत्पन्नावर खर्चाबद्दल अनभिज्ञ असतात .अशा परिस्थितीमध्ये देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन अचूक होत नाही.

4) व्यावसायिक वर्गीकरणाचा अभाव : भारतासारख्या देशात लोक आपल्या उदरनिर्वाहासाठी लागणारे उत्पन्न एकापेक्षा अधिक व्यवसायातून मिळवतात.उदा.भारतीय शेतकरी शेतीमध्ये काम करतात परंतु जेव्हा त्यांना शेतीमध्ये काम नसते तेव्हा ते कुटीर उद्योग व लघु उद्योगांमध्ये काम करतात,दुसऱ्याच्या शेतावर काम करतात.त्यांना शेतमजूर समजावे की औद्योगिक कामगार समजावे हा प्रश्न निर्माण होतो. तसेच शेतकरी दुग्ध व्यवसाय,कुक्कुटपालन यासारखे दुय्यम व्यवसायही करतात.जेव्हा लोकांना उत्पन्नाचे अनेक मार्ग असतात तेव्हा त्यांचा उत्पन्नाचा प्रमुख मार्ग शोधणे अवघड बनते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना उत्पन्नाचा प्रमुख मार्ग दुर्लक्षित राहण्याची शक्यता असते.

5) क्षेत्रवार विभागणी : कोणत्या क्षेत्रात किती उत्पन्न निर्माण झाले याचा हिशोब केला जातो पण व्यवहारात हा काटेकोर हिशेब जवळजवळ अशक्य असतो. उदा.भारतातील लहान शेतकरी स्वतःच्या शेतावर काम करतो,दुसऱ्याकडे मजुरीवर काम करतो, साखर कारखान्याकडे ऊस वाहून नेण्यासाठी गाडी भाडेही करतो,दुग्ध व्यवसाय करतो.त्याचे एकूण उत्पन्न शेती,शेतमजुरी,वाहतूक आणि दूधदुभते या क्षेत्रातून मिळते हे वेगळे करून सांगणे शक्य नाही .

6) स्थिर भांडवलाचा उपभोग : एकूण राष्ट्रीय उत्पन्नातून घसारा वजा केल्यानंतर आपणास निव्वळ राष्ट्रीय उत्पादनाचे मूल्य समजते परंतु विशिष्ट वर्षातील भांडवली वस्तूंच्या घसारा मूल्याचे मापन करणे खूप अवघड आहे .त्यामुळे घसारा मूल्याचे मापन प्रत्येक जण आपल्या वैयक्तिक दृष्टिकोनानुसार करतो.

7) आकडेवारीतील त्रुटी : राष्ट्रीय उत्पन्नाच्या मापनासाठी अनेक क्षेत्रांमधून आकडेवारी गोळा केली जात असते बऱ्याचदा व्यवहारात या आकडेवारीची जुळवाजुळव करण्याचा प्रयत्न होत असतो.त्यामुळे आकडेवारीत आपोआप त्रुटी निर्माण होतात. आवश्यक ते आकडेवारी उपलब्ध नसणे ही प्रमुख अडचण आहे म्हणून अनेक बाबी राष्ट्रीय उत्पन्नात येणे आवश्यक असूनही आकडेवारीच्या अभावी तसा समाविष्ट होऊ शकत नाहीत. उदा- रस्त्याच्या कडेला लावलेल्या झाडांपासूनचे फळ उत्पादन,परसबागेतील भाजीपाल्यांचे उत्पादन, अनधिकृत बांधकामे इत्यादीचे अंदाज करणे केवळ अशक्य आहे.

8) आकडेवारी गोळा करण्यातील अडचणी : काही अडचणी अशा असतात की तत्त्वतः आकडेवारी मिळू शकते पण ती गोळा करणे शक्य होत नाही.लोकांकडे नोंदी ठेवलेल्या नसतात.लोक अडाणी असतात तेव्हा तर आवश्यक तो तपशील देणे त्यांना मुळीच शक्य होत नाही.अनेक वेळा प्राप्तिकर चुकवण्यासाठी लोक खोटे उत्पन्न दाखवतात तेच आकडे इकडेही सांगितले जातात.माहिती गोळा करणाऱ्यांचेही काही पूर्वग्रह असतात किंवा ते अपेक्ष इतके जाणकार व कार्यक्षम नसतात.

प्रश्न : राष्ट्रीय उत्पन्न मापनाचे /गणनेचे महत्त्व(Importance of National Income)

उत्तर: 1) राष्ट्रीय उत्पन्न त्या राष्ट्राचे आर्थिक स्थिती दाखवते स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाला एकूण लोकसंख्येने भागून जे उत्पन्न येते त्या दरडोई उत्पन्नाच्या आधारे वेगवेगळया देशातील लोकांच्या आर्थिक परिस्थितीची तुलना करता येते .

2) राष्ट्रीय उत्पन्न पाहिल्यास लोकांचे राहणीमान लक्षात येते.

3) लोकांचे राहणीमान कसे बदलत आहे देशाचा आर्थिक विकास कसा व कितपत होत आहे हे राष्ट्रीय उत्पन्नाची दरवर्षीचे आकडे घेऊन त्यांची तुलना केल्यास समजते .

4) शेती,उद्योग,व्यापार इत्यादी अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रातील उत्पन्नाच्या तुलनात्मक अभ्यासावरून कोणत्या क्षेत्राची प्रगती कमी अथवा जास्त होते आहे हे कळते.

5) आर्थिक विकासआणि रोजगार यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या बचत,गुंतवणूक आणि उपभोग खर्च या बाबींचे प्रत्यक्ष आकडेवारी मिळते.

6) राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून ते उत्पन्न समाजातील वेगवेगळया गटात कसे विभागले गेले जाते ते समजते.

7)आर्थिक नियोजनात भावी योजना तयार करताना बचतीचा दर,गुंतवणुकीचा दर,उत्पन्नातील योग्य वाढ इत्यादी इष्टांक ठरविताना राष्ट्रीय उत्पन्नावरील आकडेवारीचे बहुमोल सहाय्य होते.

8) अर्थशास्त्रामध्ये संशोधकांना राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून आर्थिक कल्याण व आर्थिक विषयामध्ये जे स्वरूप समजण्यास महत्त्व होते राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून संशोधक विविध क्षेत्रात होणाऱ्या बदलांच्या प्रवृत्ती स्पष्ट करतात.

9) राष्ट्रीय उत्पन्नात झालेल्या वाढीवरून देशाच्या आर्थिक प्रगतीत होणारे बदल समजतात देशाच्या आर्थिक वृद्धी दरावरून इतर देशांच्या आर्थिक वृद्धी दराचे तुलना करता येते

10) राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीवरून देशाला भेडसावणाऱ्या दारिद्र्य, बेकारी, आर्थिक विषमता,प्रादेशिक असमतोल इ.आर्थिक प्रश्नांची मीमांसा करता येते व प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी उपाय योजना सुचविता येतात.

राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह/उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह : द्वि - क्षेत्रीय प्रतिमान -

आधुनिक अर्थव्यवस्थेत विनिमयाचे व्यवहार पार पाडण्यासाठी पैशाचा वापर केला जातो.पैशाचा वापर विनिमय माध्यम म्हणून केला गेल्याने वस्तू विनिमयातील अडचणी दूर झाल्या.अर्थव्यवस्थेत कुटुंबे उद्योगसंस्था व सरकार हे तीन मुख्य विभाग कार्य करतात .कुटुंबे उद्योगसंस्थांना उत्पादन घटकांचा पुरवठा करतात व त्या बदल्यात उद्योग संस्थांकडून कुटुंबे पैशाच्या स्वरूपात मोबदला मिळवतात. या पैशाचा विनीयोग कुटुंबे उद्योग संस्थांकडून वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी करतात.उद्योग संस्था कुटुंबांना वस्तू व सेवांचे विक्री करतात व त्याबद्दल पैशाच्या रूपाने उत्पन्न मिळवतात.मिळवलेल्या उत्पन्नाचा विनीयोग कुटुंबाकडून श्रम,भूमी,भांडवल आणि संयोजक या घटक सेवा खरेदी करण्यासाठी वापरतात व त्याबद्दल कुटुंबांना खंड,मजुरी,व्याज व नफा हे सर्व मोबदले पैशाच्या स्वरूपात दिले जातात. अर्थव्यवस्थेतील कुटुंबे,उद्योगसंस्था यांना जे काही उत्पन्न मिळते ते उत्पन्न चक्राकार गतीने एका घटकांकडून दुसऱ्या घटकाकडे सातत्यपूर्ण फिरत राहते,अशारीतीने कुटुंब व उद्योग संस्था या परस्परावलंबनातून अर्थव्यवस्थेत उत्पन्नाचा वर्तुळाकार /चक्राकार प्रवाह निर्माण होतो.एकाचे उत्पन्न दुसऱ्याचा खर्च असल्याने उत्पन्न वर्तुळाकार गतीने फिरत राहते.

राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह म्हणजे अर्थव्यवस्थेतील उत्पादन कार्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक घटकाला त्याच्या सहभागाबद्दल जो मोबदला प्राप्त होतो तो मोबदला एका घटकांकडून दुसऱ्या घटकाकडे सतत

सुरू राहतो व तो चक्राकार गतीने फिरत राहतो. अर्थव्यवस्थेत ज्या दिशेने पैसा फिरत असतो त्याच्या विरुद्ध दिशेने वस्तू व सेवांचा चक्राकार प्रवाह सतत फिरत असतो.

राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह खालील आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करता येईल.

व्याख्या: " देशातील उद्योग संस्थांकडून उत्पन्नाचा प्रवाह कुटुंबाकडे उत्पादक घटकांच्या मोबदल्यात येतो व तेच उत्पन्न कुटुंबाकडून वस्तू व सेवांच्या मोबदल्यात उद्योगसंस्थांकडे येते.अशा रीतीने उद्योग संस्थांकडून कुटुंबाकडे व कुटुंबांकडून उद्योगसंस्थांकडे उत्पन्नाचा जो प्रवाह सतत चालू राहतो त्याला उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह असे म्हणतात ".

आकृती :



गृहिते :

1) कुटुंब आपल्या उत्पन्नातून बचत करत नाही उद्योग संस्था नफ्यातून बचत करत नाही.

2)सरकार कर आकारत नाही. कुटुंब व उद्योग संस्थांकडून घटकसेवा वस्तू व सेवा खरेदी करत नाही.

3) अर्थव्यवस्था बंदिस्त आहे. आयात /निर्यात व्यापार होत नाही.

उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहातील वाढ व घट :

अ) उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहातील वाढ (अंत:क्षेपण) - "जेव्हा कुटुंबाचा खर्च न वाढता उद्योग संस्थांच्या उत्पन्नात वाढ होते व उद्योग संस्थेचा खर्च न वाढता कुटुंबाचे उत्पन्न वाढते तेव्हा त्याला उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहातील वाढ किंवा भर (अंत:क्षेपण) असे म्हणतात" .यामुळे उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात वाढ होते.

उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात पुढील घटक भर टाकतात.

i) गुंतवणूक (I) : जेव्हा उद्योग संस्था न वाटलेल्या नफ्यातून गुंतवणूक करतात अथवा वित्तीय बाजारात कर्ज घेऊन गुंतवणूक करतात तेव्हा उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात वाढ होते.

ii) सरकारी खर्च (G) : जेव्हा सरकार कुटुंबाकडून घटक सेवा विकत घेते तेव्हा कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ होते.जेव्हा सरकार कुटुंबांना निवृत्तीवेतन ,बेकारी भत्ता या स्वरूपात मदत करते आणि उद्योगसंस्थांना आर्थिक सहाय्य,अनुदान देते तेव्हा उद्योग संस्थांचे उत्पन्न वाढवून उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात वाढ होते.

iii) निर्यात (X) : जेव्हा परदेशातील नागरिक भारतातील उद्योग संस्थांकडून वस्तू व सेवा खरेदी करतात तेव्हा भारतीय उद्योग संस्थांच्या उत्पन्नात वाढ होते व उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात भर पडते.

अशा रीतीने गुंतवणूक खर्च सरकारी खर्च व निर्यातीत वाढ झाल्यास उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात वाढ होते.

ब) उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाह होतील घट /संहरण /गळती :

कुटुंबाच्या खर्चात वाढ होऊन उद्योगसंस्थेचे उत्पन्न वाढत नसेल अथवा उद्योगसंस्थेच्या खर्चात वाढ होऊन कुटुंबाचे उत्पन्न वाढत नसेल तर त्याला उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहातील घट असे म्हणतात. यामुळे उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहातील पैसा बाहेर जाऊन उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाह कमी होतो.उत्पन्नात घट होते.

उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात पुढील घटकांमुळे घट होते.

i) बचत: जेव्हा कुटुंबे आपल्या उत्पन्नाचा काही भाग खर्च करत नाही म्हणजे बचत करतात तेवढे उत्पन्न उद्योगसंस्थांचे कमी होते ;जेव्हा उद्योगसंस्था नफा वितरित करत नाही तेव्हा तेवढे उत्पन्न कुटुंबांना प्राप्त होत नाही.

ii) कर : जेव्हा सरकार कुटुंबावर कर बसवते तेव्हा कराची रक्कम सरकारी तिजोरी जमा होते .ती रक्कम उद्योगसंस्थांना उत्पन्न रूपाने प्राप्त होत नाही.जेव्हा सरकार उद्योगसंस्थांवर कर बसवते तेव्हा ती रक्कम सरकारी तिजोरीत जमा होऊन तेवढी रक्कम कुटुंबांना उत्पन्न म्हणून मिळत नाही .

iii) आयात : जेव्हा भारतीय उपभोक्ते परदेशातील उद्योग संस्थांकडून वस्तू व सेवा खरेदी करतात तेव्हा परदेशातील उद्योग संस्थांच्या उत्पन्नात वाढ होऊन देशातील पैसा परदेशात जातो.त्यामुळे देशातील उद्योग संस्थांच्या उत्पन्नात घट होऊन उत्पन्नाच्या प्रवाहात घट होते .

अशा रीतीने बचत, कर व आयातीमुळे उत्पन्न प्रवाहातील पैसा बाहेर जातो व उत्पन्न प्रवाहात घट घडून येते.

सरावासाठी प्रश्न एक ते दोन वाक्यात उत्तर लिहा.

1) राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या लिहा .

2) डॉ. मार्शल यांची राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या लिहा

3) भारतीय राष्ट्रीय उत्पन्न समितीने केलेली राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या लिहा.

4) राष्ट्रीय उत्पन्नाची कोणतेही दोन वैशिष्ट्ये सांगा.

5) राष्ट्रीय उत्पन्नाचे महत्त्व सांगा.

6) स्थूल राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे काय ?

7) निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे काय ?

8) दरडोई उत्पन्न म्हणजे काय?

9) व्ययशक्य उत्पन्न म्हणजे काय ?

10) राष्ट्रीय उत्पन्न मापणातील तील संकल्पनात्मक अडचणी म्हणजे काय ?

11) राष्ट्रीय उत्पन्न मापनातील कोणत्याही दोन संकल्पनात्मक अडचणी लिहा.

12) राष्ट्रीय उत्पन्न मापनातील कोणत्याही दोन व्यवहारिक अडचणी लिहा.

13) राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह म्हणजे काय ?

14) NNP चे पूर्ण रूप लिहा.

15) GDP चे पूर्ण रूप लिहा.

16) GNP चे पूर्ण रूप लिहा.

17) राष्ट्रीय उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात भर टाकणारे घटक कोणते आहेत?

18) राष्ट्रीय उत्पन्नाच्या चक्राकार प्रवाहात घट घडवून आणणारे घटक कोणते आहेत?